पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834.
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

**प्रेसनोट** दिनांक 07.04.2022

# पोहरादेवी यात्रा बंदोबस्त करीता वाशिम पोलीस दल सज्ज --- पोलीस अधिक्षक वाशिम

दिनांक 10.04.2022 रोजी रामनवमी हा उत्सव वाशिम जिल्हयात साजरा करण्यात येत आहे. पोलीस स्टेशन मानोरा अंतर्गत ग्राम पोहरादेवी आणि उमरी खुर्द येथे दिनांक 07.04.2022 ते दिनांक 11.04.2022 पर्यंत ( रामनवमी ) जगदंबा देवी आणि सामकीमाता यात्रा उत्सव साजरा करण्यात येत आहे पोहरादेवी ही वंजारा समाजाची काशी समजल्या जाते. यात्रा काळात पोस्टे मानोरा हद्दीमध्ये मोठया प्रमाणावर गर्दी राहते त्यामुळे वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्वोतोपरी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

यात्रेदरम्यान गर्दीचे नियमन करण्यासाठी, आकस्मिक परीस्थिती उदभवल्यास त्यास तात्काळ प्रतिबंधक करण्यासाठी वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व संबंधित शासकीय विभागांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांनी यात्रेच्या बंदोबस्ताचे नियोजन करण्यासाठी ग्राम पोहरादेवी आणि उमरी खुर्द येथे भेट देउन संपुर्ण यात्रा परीसराची पाहणी केली आहे. वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने 01 अपर पोलीस अधिक्षक, 1 पोलीस उपअधिक्षक, 07 पोलीस निरीक्षक, 40 सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी, 450 पोलीस अंमलदार इतका बंदोबस्त नेमण्यात आला आहे. महिलांच्या छेडखानीस प्रतिबंध करण्यासाठी निर्भया पथक तैनात करण्यात आले आहे. महीलांना छेडछाड केल्यास किंवा इतर बेकायदेशीर कृत्य केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. गर्दीच्या ठिकाणी व्हिडीओ कॅमेऱ्यांसह पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात आली आहे.

मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी यात्रेमध्ये बोकडबळीस निर्बंध घालण्याचे अनुषंगाने आणि कायदा व सुव्यवस्थेचे अनुषंगाने ग्राम पोहरादेवी ता मानोरा जि वाशिम येथील जगदंबादेवीचे मुख्य मंडपाचे सभामंडप व त्यालगतच्या 200 मीटर परीसरात दिनांक 07.04.2022 ते 11.04.2022 रोजी पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागु केले आहेत.

या महिन्यात रामनवमी उत्सव, पोहरादेवी यात्रा, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती, महाविर ज्यंती, हनुमान जयंती इत्यादी महत्वाचे बंदोबस्त असल्याने पुर्वतयारी म्हणुन मा. पोलीस अधिक्षक यांनी जिल्हयातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रभारी अधिकारी यांची दिनांक 06.04.2022 रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय येथे मिटींग घेउन सणउत्सव अनुषंगाने बंदोबस्त बाबत करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे सण उत्सव आणि यात्रा दरम्यान शांतता राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

07/04/22

पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा,वाशिम.

Scanned by CamScanner